

शहीदपासून जमलेली जोडी:
दिलीपकुमार-कामिनी
नदिया के पारमध्ये

फिल्मीस्तानच्या शहीदमध्ये अगोदर अशोककुमार नायक म्हणून ठरला असताना पडद्यावर मात्र दिलीपकुमार चमकला...


□ इसाक मुजावर

१५ ऑगस्ट १९४७ला भारत स्वतंत्र झाला त्यानंतर स्वातंत्र्य संग्रामाच्या पार्श्वभूमीवरील अनेक हिंदी चित्रपट तयार झाले. १९४८चा फिल्मीस्तानचा *शहीद* हा त्यापैकी पहिला चित्रपट म्हणता येईल. त्याकाळचा आघाडीचा नायक अशोककुमार फिल्मीस्तानचा एक भागीदारही होता. सहाजिकच *शहीद*च्या निर्मितीच्या सुरुवातीला तोच या चित्रपटाचा नायक असणार होता. पण नंतर मात्र या भूमिकेतून त्याने अंग काढून घेतलं. कारण होतं त्यात नायकाच्या आईची भूमिका करणारी अभिनेत्री लीला चिटणीस.

आज लीला चिटणीस एक इतिहासजमा अभिनेत्री असली तरी पन्नास ते सत्तरच्या दशकात अनेक चित्रपटांतून दिलीपकुमार, राज कपूर व देव आनंद यांच्या आईच्या भूमिकेत ती चमकली. त्याच्याही आधी म्हणजे चाळीसच्या दशकातली ती एक लोकप्रिय नायिका होती हे फार थोड्या लोकांना माहीत असेल. *कंगन, बंधन, झुला* या चित्रपटात अशोककुमारबरोबर तिची जोडी हिट ठरली होती. त्यामुळे *शहीद*मध्ये लीला चिटणीसच्या मुलाची भूमिका करण्याची कल्पना अशोककुमारला पटली नाही. अखेरीस दिलीपकुमार नायक म्हणून आणि कामिनी

लीला चिटणीसमुळे अशोककुमार शहीद होऊन दिलीपकुमारची वर्णी लागली

झुलामध्ये लीला चिटणीससह अशोककुमार





*शहीद*मध्ये मनोजकुमार


कौशल नायिका चमकले. *शहीद* या जोडीचा पहिला चित्रपट. त्यांचा *नदिया के पार* हा आणखी एक चित्रपट १९४८ सालीच पडद्यावर आला आणि ही जोडी हिंदीतील हिट जोडी बनली. *शहीद*, *नदिया के पार*नंतर *शबनम* व *आरजू* या दोन चित्रपटांत ते पुन्हा एकत्र दिसले. *आरजू*बरोबरच ही जोडी संपली.

१९४८च्या *शहीद*नंतर *शहीद* नावाचा आणखी एक चित्रपट १९६५ला आला होता. त्यातही कामिनी कौशल होती. पण नायिका म्हणून नव्हे तर नायकाच्या आईच्या भूमिकेत. भगतसिंगच्या जीवनावर बेतलेल्या या चित्रपटात मनोजकुमारने भगतसिंगची भूमिका साकारली आणि कामिनी कौशलने त्याच्या आईची. काय गमतीदार योगायोग आहे पाहा. १९४८च्या *शहीद*ने लीला चिटणीसचा नायिकेचा चेहरा पुसून तिला आईचा चेहरा दिला आणि १९६५च्या *शहीद*ने कामिनी कौशलला नायिकेची इमेज बदलून आईचा चेहरा दिला. पहिल्या *शहीद*चे लेखक-दिग्दर्शक होते रमेश सायगल. १९४७चा *रेणुका* हा त्यांच्या दिग्दर्शनातला पहिला चित्रपट फ्लॉप ठरला पण *शहीद*ने त्यांना यशस्वी दिग्दर्शक बनवलं आणि त्यानंतर त्यांनी *समाधी*, *२६ जनवरी*सारखे देशभक्तीपर चित्रपट बनवले.

स्वातंत्र्य संग्रामाच्या पार्श्वभूमीवर सुरुवातीला बनलेल्या चित्रपटांत मुलगा स्वातंत्र्यसैनिक तर बाप पोलीस इन्स्पेक्टर वा न्यायाधीश असे. १९४८च्या *शहीद*चाही हाच फॉर्म्युला होता. यात स्वातंत्र्य सैनिक दिलीपकुमारच्या न्यायाधीश पित्याची भूमिका चंद्रमोहननी साकारली. १९३४च्या प्रभातच्या *अमृतमंथन*मध्ये राजगुरूची नकारात्मक भूमिका करून ते चित्रपटात आले. त्यानंतर जहांगीर(*पुकार*), दुष्यंत(*शकुंतला*)सारख्या चित्रपटात नायकाच्या भूमिकाही त्यांनी केल्या. *मुगल-ए-आजम*मध्ये अकबर बादशहाची भूमिकाही आधी तेच करत होते. पण चित्रपट पूर्ण होण्यापूर्वीच १९४९ला त्यांचं निधन झालं.

चंद्रमोहनप्रमाणेच *शहीद*मधील आणखी एक कलावंत १९४९ साली आपल्यातून गेला. हास्य अभिनेता व्ही. एच. देसाई. बी.ए.एल.एल.बी. झाल्यानंतर त्याने वकिली करण्याचा प्रयत्न केला. पण न चालल्याने हास्य अभिनेता म्हणून तो चित्रपटात आला. मात्र *शहीद*मध्ये त्याने कामिनी कौशलच्या पित्याची भूमिका केली. *शहीद*नंतर १९४९च्या मेहबूब खान यांच्या *अंदाज*मध्ये तो अखेरचा दिसला. एस.एल.पुरी, प्रभू दयाल, रामसिंग, राज अदीब, छोट्या दिलीपकुमारच्या भूमिकेत बालकलाकार शशी कपूर यांच्या या चित्रपटात भूमिका होत्या. हा बालकलाकार म्हणजे पृथ्वीराज कपूर यांचा मुलगा अभिनेता शशी कपूर नव्हे. त्या काळात शशी कपूर नावाचा अन्य एक बालकलाकार होता. तो प्रामुख्याने धार्मिक चित्रपटात काम करायचा. आजचा शशी कपूर तेव्हा शशीराज नावाने बालकलाकार म्हणून काम करत होता.

१९५०च्या *आँखे*द्वारा संगीतकार बनलेला मदनमोहन पूर्वी फिल्मीस्तानचे एक भागीदार राय बहादूर चुनीलाल यांचा पुत्र. *शहीद*मध्ये एका छोट्याशा भूमिकेत तो पडद्यावर दिसला. दिग्दर्शक रमेश सायगलदेखील या चित्रपटात 'वतन के राह पर वतन के नौजवां शहीद हो...' हे गाणं दिलीपकुमारबरोबर गाताना पड दिसले.



*शहीद*चे संगीतकार गुलाम हैदर फाळणीनंतर पाकिस्तानला स्थायिक झाले होते. सुरुवातीला काही काळ भारतात येऊन ते चित्रपटांना संगीत देत होते. *शहीद*मध्ये त्यांनी संगीतबद्ध केलेलं 'वतन की राह पे...' गाणं चांगलंच लोकप्रिय ठरलं होतं. खान मस्ताना व रफी यांनी हे गाणं गायलं होतं. खान मस्ताना तेव्हा लोकप्रिय पार्श्वगायक होता आणि रफी त्याच्यासमोर एकदम नवखा. पण पाहता पाहता रफी लोकप्रिय पार्श्वगायक बनला आणि खान मस्ताना त्याच्यासमोर कोरसमध्ये गाणारा एक गायक. १९७२ला त्याचं निधन झालं. त्याआधी त्याची परिस्थिती इतकी खालावली होती की तो मुंबईला माहीमच्या दर्ग्यात फकीर बनून भीक मागताना दिसायचा. आज तो आपल्यात नाही. रफीही नाही. गुलाम हैदरही नाहीत. पण त्यांचं 'वतन की राह पे...' हे गाणं आजही ते १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला रेडिओवर वाजतं व खान मस्ताना, रफी, गुलाम हैदर यांची आठवण जागी करतं. रफी व खान मस्ताना या दोन गायकांबरोबर ललिता देऊळकर, सुरिंदर कौर व गीता दत्त या गायिकांचे आवाज *शहीद*मध्ये होते. पैकी ललिता देऊळकर म्हणजे नंतरच्या श्रीमती सुधीर फडके. त्यांनी 'वतन की राह पे...' व 'बचपन की याद धीरे धीरे प्यार बन गई...' ही दोन गाणी गायली होती. 'बदनाम न हो जाए मुहब्बत का फसाना...', 'हम कहां और तुम कहां...' व 'आना है तो आ जाओ...' ही तीन गाणी सुरिंदर कौरने व 'आ जा बेदर्दी बालमा...'गीता दत्तने गायलं. 'वतन के राह पे...', 'तकदीर की आंधी...', 'हम कहां और तुम...' व 'आजा बेदर्दी बालमा...' चे गीतकार राजा मेंहदी अली खान होते. 'बदनाम न हो जाए मुहब्बत का फसाना...' व 'बचपन की याद...' चे कमर जलालाबादी व 'आना है तो आ जाओ...' चे गीतकार नखशब होते.



रफी



मदन मोहन



चंद्रमोहन

१९४८च्या *शहीद*नंतर दिलीपकुमारने रमेश सायगल यांच्या *शिकस्त*(१९५३) या आणखी एका चित्रपटात भूमिका केली. *शहीद*च्या वेळी दिलीपकुमार तसा नवाच होता त्यातच तेव्हा हिंदीत दिग्दर्शकाचा वरचष्मा असायचा. यामुळे *शहीद*चे चित्रण चालू असताना त्याला वगळून रमेश सायगल एकटेच ट्रायल पाहत आणि आपल्याला हवे तसे बदल करत. *शिकस्त*च्या वेळी मात्र ही परिस्थिती बदलली होती. दिलीपकुमारला बरोबर घेऊन या चित्रपटाची ट्रायल त्यांना पाहावी लागत होती आणि त्यांच्या सूचना लक्षात घेऊन त्यात बदल करावे लागत होते. कारण तेव्हा दिलीपकुमार नावाजलेला अभिनेता होता. दिग्दर्शकाला देखील त्याच्यासमोर शिकस्त-हार पत्करावी लागत होती.